# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागांतर्गत,
**{सामान्य प्रशासन विभाग}** स्थापन करण्यात आलेल्या वायु गुणवत्ता संचालन कक्षांतर्गत, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम व 15 वित्त आयोगाच्या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडा, सुक्ष्म नियंत्रण कृती आराखडा, वायु प्रदुषण नियंत्रणासंबंधीत प्रकल्प राबविणे, वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडे माहिती सादर करणे उपयोगिता प्रमाणे पत्र सादर करणे, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर वेळोवेळी सादर केलेली माहिती अद्यावत करणे व शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे वेळोवेळी माहिती शासनास सादर करणे इत्यादी कामे करण्यासाठी जाहिरात क्र. 505/पी.आरदि. 14.02.2022 च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. रूपराव राऊत, सेवानिवृत्त उपअभियंता व श्री. चंद्रकांत गभणे, सेवानिवृत्त उपअभियंता यांना करार/कंत्राटी पद्धतीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 53(3) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: 6 महिन्याकरिता, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक तत्वावर कार्यालयीन आदेश क्र. 204 (A) 204 (B) ओ.ॲण्ड.एम, दि. 31.03.2022 अन्वये "प्रकल्प अधिकारी (तांत्रिक सल्लागार)" (वायु प्रदुषण नियंत्रण संबंधित तांत्रिक काम करण्याकरिता) "प्रकल्प सहयोगी" (तांत्रिक सल्लागार)" (केंद्र व राज्य शासन प्राप्त निधी अंतर्गत प्रकल्प राबविणे) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांची नियुक्ती दि. 03.04.2023 रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे व त्यांना करार पद्धतीवर पुढील 6 महिन्याकरीता मुदतवाढ दयावयाची असल्याने दि. 04/04/2023 रोजी (शासकीय सुट्टी) असल्यामुळे तांत्रिक खंड देवून दि.06/04/2023 पासुन दि. 05/10/2023 पर्यंत मुदतवाढ दयावी लागेल. याप्रमाणे अंदाजे रू. 5,83,020/- इतका एकूण खर्च येणार असून, प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.
टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 387/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 29/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि.), सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागांतर्गत, स्थापन करण्यात आलेल्या वायु गुणवत्ता संचालन कक्षांतर्गत, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम व 15 वित्त आयोगाच्या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडा, सुक्ष्म नियंत्रण कृती आराखडा, वायु प्रदुषण नियंत्रणासंबंधीत प्रकल्प राबविणे, वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडे माहिती सादर करणे उपयोगिता प्रमाणे पत्र सादर करणे, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर वेळोवेळी सादर केलेली माहिती अद्यावत करणे व शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे वेळोवेळी माहिती शासनास सादर करणे इत्यादी कामे करण्यासाठी जाहिरात

क्र. 505/पी.आरदि. 14.02.2022 च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. रूपराव राऊत, सेवानिवृत्त उपअभियंता व श्री. चंद्रकांत गभणे, सेवानिवृत्त उपअभियंता यांना करार/कंत्राटी पद्धतीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 53(3) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: 6 महिन्याकरिता, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक तत्वावर कार्यालयीन आदेश क्र. 204 (A) 204 (B) ओ.ॲण्ड.एम, दि. 31.03.2022 अन्वये “प्रकल्प अधिकारी (तांत्रिक सल्लागार)” (वायु प्रदुषण नियंत्रण संबंधित तांत्रिक काम करण्याकरिता) “प्रकल्प सहयोगी” (तांत्रिक सल्लागार)” (केंद्र व राज्य शासन प्राप्त निधी अंतर्गत प्रकल्प राबविणे) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांची नियुक्ती दि. 03.04.2023 रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे व त्यांना करार पद्धतीवर पुढील 6 महिन्याकरीता मुदतवाढ दयावयाची असल्याने दि. 04/04/2023 रोजी (शासकीय सुट्टी) असल्यामुळे तांत्रिक खंड देवून दि.06/04/2023 पासुन दि. 05/10/2023 पर्यंत मुदतवाढ दयावी  लागेल. याप्रमाणे अंदाजे रू. 5,83,020/- इतका एकूण खर्च येणार असून, प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**